पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे - १७

ड प्रभाग समिती,

कार्यपत्रिका क्र.९

सभावृत्तांत

दिनांक ०६/१२/२०१३ वेळ दुपारी १२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची मासिक सभा शुक्रवार दि. ०६/१२/२०१३ रोजी दुपारी १२.०० वाजता ड प्रभाग कार्यालयाच्या छत्रपती शाहू महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस पुढीलप्रमाणे सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा.सोनाली जम | अध्यक्ष, |
| २. | मा.विनोद नढे | सदस्य |
| ३ | मा.अप्पा पवार | सदस्य |
| ४. | मा.निलेश बारणे | सदसय |
| ५. | मा.विनय गायकवाड | सदस्य |
| ६. | मा.विलासराव नांदगुडे | सदस्य |
| ७. | मा.बापु काटे | सदस्य |
| ८. | मा. रामदास बोकड | सदस्य |
| ९. | मा. विमल काळे | सदस्या |
| १०. | मा.निता पाडाळे | सदस्या |
| ११. | मा.अनिता तापकीर | सदस्या |
| १२. | मा.विमलताई जगताप | सदस्या |
| १३. | मा.झामाबाई बारणे | सदस्या |
| १४. | मा.स्वाती कलाटे | सदस्या |
| १५. | मा.आरती चोंधे | सदस्या |
| १६. | मा.वैशाली जवळकर | सदस्या |
| १७. | मा. शैलजा शितोळे | सदस्या |
| १८. | मा.सुषमा तनपुरे | सदस्या |

याशिवाय मा.पी.एच.झुरे, प्रभाग अधिकारी, मा.मनोज लोणकर, प्रशासन अधिकारी, सभा शाखा, मा.गुलाब दांगट, कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा. शरद जाधव, कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग, मा. एस.डी.पोरेडी, उपअभियंता, स्थापत्य .मा.रामनाथ टकले उपअभियंता, स्थापत्य, मा.विजय ओव्हाळ, उपअभियंता मा.रविंद्र पवार, उपअभियंता जलनिसारण विभाग, मा.शेख, उपअभियंता पाणीपुरवठा विभाग, मा.केदारी उपअभियंता, विदयुत, मा.दिलीप धुमाळ, उपअभियंता , विदयुत, व्ही. एम. इंगुळकर लेखाधिकारी इत्यादी अधिकारी उपस्थित होते.

सभेच्या सुरुवातीस मा.अध्यक्ष यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात केली. तदनंतर मा.अध्यक्ष यांचे मान्यतेने व मा.सदस्य यांचे मागणीप्रमाणे खाली नमुद केलेप्रमाणे ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेण्यात आले

१. प्रभाग क्रमांक ५६ वैदुवस्तीमधील विविध चौकांना नांवे देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.
२. प्रभाग क्रमांक ५६ वैदुवस्तीमधील रस्त्याला नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.
३. प्रभाग क्रमांक ५६ वैदुवस्तीमधील रस्त्याला नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.
४. कै.वसंतदादा पुतळा सुशोभीकरण करण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.सोनाली जम यांचा प्रस्ताव.
५. थेरगांव येथील शाळेचे नांव नागु गतिराम बारणे प्राथमीक शाळा आहे ते बदलुन कै. नागुभाऊ गतिराम बारणे करणेस तसेच कै.नागुभाऊ गतिराम बारणे यांचे अर्धपुतळयाचे अनावरण करणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.माया बारणे यांचा प्रस्ताव.
६. प्रभाग क्रमांक ५६ वैदुवस्तीमधील वैदुवस्ती येथील कचरा कुंडी व संडास हलविणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा. वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.
७. नागपंथील डवरी सामाजीक संस्था या परिसरात शौचालय देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.निता पाडाळे यांचा प्रस्ताव.
८. प्रभाग क्रमांक ५३ मधील शाळा इमारतींची स्थापत्यविषयक दुरुस्ती करणे या कामामधून म्हातोबा मंदिरामधील उदयानालगतची रिटेनिंग वॉल बांधणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.स्वाती कलाटे यांचा प्रस्ताव.
९. थेरगांव वॉर्ड क्रमांक ५० मध्ये नामफलक बसवून मिळणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.झामाबाई बारणे यांचा प्रस्ताव.
१०. वॉर्ड क्रमांक ६० सांगवी गावठाणमधील हिरकणी हौसींग सोसायटीमधील माध्यमिक शाळेचे आरक्षण रदद करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.सोनाली जम यांचा प्रस्ताव.

ठराव क्रमांक ३६ विषय क्र.१

दिनांक ६/१२/२०१३ विभाग - स्थापत्य

सुचक - मा.वैशाली जवळकर अनुमोदक - मा.सुषमा तनपुरे

संदर्भ :- मा.वैशाली जवळकर यांचा दिनांक ६/१२/२०१३ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक ५६ वैदुवस्ती मधील पुढे नमुद केलेप्रमाणे १. जवळनगर नगर येथे मिलेटरीच्या जागेला जेथे ४५ मीटर रस्ता जोडला गेला आहे तेथे सुदर्शन नगरकडून सिध्देश्वर पार्ककडे रस्ता जातो तेथे होणा-या चौकाला धर्मवीर संभाजी महाराज चौक जवळकरनगर असे नांव देणेस तसेच २. कल्पतरु फेज ३ पासून जो ६० फुटी रस्ता ४५ मीटरला जेथे जोडला गेला आहे. तेथे ४५ मीटरच्या रस्त्यावरील चौकाला श्री म्हसोबा मंदिर काशीद पार्क चौक असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक ३७ विषय क्र.२

दिनांक ६/१२/२०१३ विभाग - स्थापत्य

सुचक - मा.वैशाली जवळकर अनुमोदक - मा.सुषमा तनपुरे

संदर्भ :- मा.वैशाली जवळकर यांचा दिनांक ६/१२/२०१३ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक ५६ वैदुवस्तीमधील जवळकरनगर मधील ४५ मीटर रस्त्यापासून जो ४० फुटी रस्ता क्रांतीनगर समोरुन साई सृष्टीबिल्डींग (काशीद पार्क) कडे जातो त्या रस्त्याला कै.सौ.लक्ष्मीबाई पंढरीनाथ काशीद मार्ग असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक ३८ विषय क्र.३

दिनांक ६/१२/२०१३ विभाग - स्थापत्य

सुचक - मा.वैशाली जवळकर अनुमोदक - मा.सुषमा तनपुरे

संदर्भ :- मा.वैशाली जवळकर यांचा दिनांक ६/१२/२०१३ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक ५६ वैदुवस्तीमधील जवळकरनगर मधील कल्पतरु फेज १ व कल्पतरु फेज २ मधून ४५ मीटर कडून जो रस्ता सृष्टी चौकाकडे जातो त्या रस्त्याला कै.माऊली उर्फ ज्ञानोबा पांडुरंग जवळकर मार्ग असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक ३९ विषय क्र.४
दिनांक ६/१२/२०१३ विभाग - स्थापत्य
सुचक - मा.सोनाली जम अनुमोदक - मा.सुषमा तनपुरे

संदर्भ :- मा.सोनाली जम यांचा दिनांक ६/१२/२०१३ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक ६० सांगवी गावठाण या वॉर्डामध्ये कै.वसंतदादाचा अर्धाकृती पुतळा आहे त्याठिकाणी नावाची पाटी लावणेस व पुतळयास निकामी झालेल्या टाईल्स दुरुस्त करुन पुतळयाचे सुशोभीकरण करण्याच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक ४० विषय क्र.५
दिनांक ६/१२/२०१३ विभाग - स्थापत्य
सुचक - मा.सुषमा तनपुरे अनुमोदक - मा.आरती चोंधे

संदर्भ :- मा.माया बारणे यांचा दिनांक ६/१२/२०१३ रोजीचा प्रस्ताव.

थेरगांव येथील सामाजीक कार्यकर्ते कै. नागुभाऊ गतीराम बारणे यांनी मनपास संतोषनगर थेरगाव येथे विनामोबदला १० गुंठे जागा शाळेसाठी दिली होती. सदर शाळा सदयसितीत चालू आहे तरी सदर शाळेचे नांव हे नागु गतिराम बारणे प्राथमिक शाळा आहे.. ते बदलुन कै. नागुभाऊ गतिराम बारणे करणेस तसेच शाळेतील परिसरामध्ये कै.नागुभाऊ गतिराम बारणे यांच्या अर्धपुतळयाचे अनावरण करण्यात यावे या सर्व अर्धपुतळयाची संपुर्ण खर्चाची जबाबदारी बारणे कुटूंबीय करण्यास तयार आहे. सबब सदरच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे..

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक ४१ विषय क्र.६
दिनांक ६/१२/२०१३ विभाग – स्थापत्य/आरोग्य
सुचक - मा.वैशाली जवळकर अनुमोदक - मा.सुषमा तनपुरे

संदर्भ :- मा.वैशाली जवळकर यांचा दिनांक ६/१२/२०१३ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक ५६ मधील वैदुवस्तीच्या पुर्वेकडील भागात असणा-या कचराकुंडीमुळे येणा-या जाणा-या तसेच त्या भागामधील नागरीकांना दुर्गंधीचा त्रास होत आहे. तरी तेथील कचराकुंडी कायमची हलवावी. तेथील कच-याची विल्हेवाट कायमस्वरुपीची लावावी. तसेच कचरा टाकण्याचे ठिकाण कायमचे बंद करावे. तसेच सदर ४० फुटी रस्त्याच्या शेजारी वैदुवस्तीच्या पुर्वेकडील असणारी सडास वापरात नाहीत. त्यामुळे त्याचा दुरुपयोग होत असल्याने त्याची पहाणी करुन ती संडास तेथून काढून घेण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानमुमते मान्य झाला

.

ठराव क्रमांक ४२ विषय क्र.७

दिनांक ६/१२/२०१३ विभाग - स्थापत्य

सुचक – मा. निता पाडाळे अनुमोदक - मा.सुषमा तनपुरे

संदर्भ :- मा.निता पाडाळे यांचा दिनांक ६/१२/२०१३ रोजीचा प्रस्ताव.

नागपंथी डवरी समाजाचे श्री गोरक्षनाथ मंदीर न्यू इंडियन कॉलनी येथे महिला भाविकांसाठी मंदीराच्या परिसरात शौचालय देण्यात यावे. याठिकाणी भक्तांची गर्दी वाढल्याकारणाने भाविकांचे शौचालयाकरीता गैरसोय होत आहे. तरी लवकरात लवकर शौचालय उपलब्ध करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक ४३ विषय क्र.८

दिनांक ६/१२/२०१३ विभाग - स्थापत्य

सुचक - मा.स्वाती कलाटे अनुमोदक - मा.शैलजा शितोळे

संदर्भ :- मा.स्वाती कलाटे यांचा दिनांक ६/१२/२०१३ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक ५३ मधील शाळा इमारतींची स्थापत्यविषयक दुरुस्ती करणे या कामाची निविदा स्थापत्य विभागामार्फत काढण्यात आली आहे. या कामामधून याच प्रभागामधील म्हातोबा मंदिरामागील उदयानालगतची रिटेनिंग वॉल बांधून मिळणेबाबत मंजूरी देण्यात यावी व स्थापत्य विभागामार्फत रिटेनिंग वॉलचे काम पुर्ण करणेबाबत कार्यवाही तातडीने हाती घेणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे..

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक ४४ विषय क्र.९

दिनांक ६/१२/२०१३ विभाग - स्थापत्य

सुचक – मा झामाबाई बारणे अनुमोदक - मा.सुषमा तनपुरे

संदर्भ :- मा.झामाबाई आरणे यांचा दिनांक ६/१२/२०१३ रोजीचा प्रस्ताव.

थेरगांव वॉर्ड क्रमांक ५० मध्ये १) दत्तनगर श्रमीक कॉलनी, २) दत्तनगर लेन नं.१, लेन नं.२, लेन नं.३, ३ ) दत्तनगर चैतन्य विहार, ४) थेरगांव बोट क्लब – केजूदेवी मंदीराकडे, ५) अरुण पार्क, ६) राघवेंद्र स्वामी मठ, ७) पवित्र आंगण, ८) साईपुष्प हौ.सोसायटी, ९) प्रसुन धाम, १०) प्रसुन धाम A, B, C, D, ११) समर्थ करिना १२) गंगा आशियाना १३) कुणाल रेसीडेन्सी १४) गंगा ओशन मिडल्स १५) साईनाथ नगर लेन नं.१,२,३ १६) दगडू पाटील नगर लेन नं.१,२,३,४,५,६ १७) रत्ना हेरिटेज, १८) पानसरे कॉलनी लेनं नं.१,२,३,४ १९) पवनेश्वर कॉलनी २०) चांदणी चौक थेरगांव गावठाण २१) जगताप नगर लेन नं.१,२,३,४ २२) साई इलिगेशन २३) मंगलम

दिप २४) रुणवाल  क्लासिक २५) पडवळनगर असे नामफलक बसविणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे..

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक  ४५ — विषय क्र.१०

दिनांक ०६/१२/२०१३ — विभाग - नगररचना

सुचक - मा.सोनाली जम — अनुमोदक - मा. सुषमा तनपुरे

संदर्भ :- मा.सोनाली जम यांचा दिनांक ०६/१२/२०१३ रोजीचा प्रस्ताव
प्रभाग क्रमांक ६० सांगवी गावठण यामध्ये हिरकणी  हौसिंग सोसायटीवर माध्यमिक शाळेचे आरक्षण टाकण्यात आले आहे . परंतु सदर सर्व्हे नंबर ७ मधील काही भागात आरक्षण क्रमांक ३२३ मध्ये तरी सदरची सोसायटी रजिस्टर असून महानगरपालिकेत गाव समाविष्ट होण्यापुर्वी स्थापन झालेली आहे त्यामुळे सोसायटीने केलेला लेआऊट तसेच जागेवर असलेले बांधकाम व ओपनस्पेस विचारात घेतलेला नाही.
सदरची सोसायटी ही १९८१ साली रजिस्टर झालेली आहे. वास्तविक पहाता महानगरपालिकेने सांगवी गांव समाविष्ट करुन घेतल्यानंतर विकास आराखडा लोकांसमोर ठेवावयास पाहीजे होता. परंतु तसे न करता तब्बल १२ वर्षांनी विकास आराखडा तयार करुन त्यावर हरकती मागवून शासनाकडे मंजूरीस पाठविला. त्यावेळी आराखडा दिनांक १८ सप्टेंबर १९९५ रोजी मंजूर केलेला आहे. तसे न करता महानगरपालिकेने सोसायटीस नोटीस व हरकत मागावयास  पाहिजे होते. तसे न केल्यामुळे होणा-या बाधीत घरावरील शाळेचे आरक्षण वगळण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदरचा प्रस्ताव मा.शहर सुधारणा समिती मार्फत मा. महापालिका सभेकडे मान्यता मिळणेकामी पाठविण्यास शिफारस करण्यात येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

यानंतर मा. अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे  प्रकट केले.

सही/-
सोनाली जम
अध्यक्षा
ड प्रभाग समिती,पिं.चिं.म.न.पा.,
रहाटणी, पुणे ज्ञ १७

सही/-
प्रशासन अधिकारी सभा शाखा
ड प्रभाग समिती ,पिं.चिं.म.न.पा.,
रहाटणी, पुणे - १७

जा.क्र.ड/सभा/कावि/ ३७ /२०१४
दिनांक ०७ /०१/२०१४
प्रति,
मा.श्री./श्रीमती -----------------------
सदस्य / सदस्या ड प्रभाग समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका